

# गांजा तस्करीत तीन महिलांसह पाच जणांना अटक

- अमरावती शहर गुन्हेशाखा युनिट - 2 ची कारवाई
- 13 लाख 52 हजार 600 रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 4)** - गांजा तस्करी करणार्या तीन महिलांसह पाच जणांना शहर गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 च्या पथकाने 4 एप्रिल रोजी नांदगांव पेठ टोल नाक्याकडुन वालकी गांवाकडे जाणार्या रोडवर अटक केली. सैय्यद राशिद सैय्यद जमशिद (35), अरफाक दानिश शब्बीर पटेल (23, दोन्ही रा. इस्लामी चौक, जुनी वस्ती बडनेरा, अमरावती, मयुरी विजय चापळकर (19, रा. वड्डुरपुरा, दर्गा जवळ, फ्रेजरपुरा, अमरावती), पुनम उमेश अंभोरे (30, रा. वड्डुरपुरा, बजरंग दल चौक, फ्रेजरपुरा, अमरावती) व निकीता सुभाष गायकवाड (21, रा. वड्डुरपुरा, दर्गा जवळ, अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून 8 लाख 6 हजार 600 रुपये किमंतीचा 40.35 किलो ग्रॅम वजनाचा गांजा, 20 हजार रुपये किमंतीचे दोन मोबाईल, 5 लाख रुपये किमंतीचे चार चाकी वाहन व 23 हजार 500 रुपयांची रोख असा एकुण 13 लाख 52 हजार 600 रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी अमरावती शहरातील अंमली पदार्थ विक्री व वाहतुकीवर प्रभावी कार्यवाही करण्याचे आदेशित केले होते. या अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 चे पोलीस निरीक्षक यांच्या नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार 4 एप्रिल रोजी पेट्रोलींग करीत होते. दरम्यान पोलिसांना गुप्त माहीती मिळाली की, नांदगांव पेठ टोल नाक्याकडुन वालकी गावांकडे जाणार्या रोडने एक काळया रंगाची स्कोडा कंपनीचे चार चाकी वाहन क्रमांक एम. एच 48 ए. 4900 मध्ये दोन पुरुष व तिन महीला गांजा नावाच्या अंमली पदार्थाची वाहतुक करीत आहेत. या माहितीवरून पोलिसांनी नांदगांव पेठ टोल नाक्याकडुन वालकी रोडवरवर सापळा रचुन नाकाबंदी केली आणि त्या वाहनास थांबविले. त्यावेळी वाहनात तीन महिलांसह दोन पुरुष बसून होते. पोलिसांनी त्यांच्या वाहनाची तपासणी केली असता, त्यामध्ये गांजा आढळून आला.

### गांजाची डिलेव्हरी देण्यासाठी जात होते आरोपी

पोलिसांनी पाचही जणांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता, ते गांजा मालाची डिलीव्हरी देण्याकरीता जात असल्याचे आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी पाचही जणांना अटक करून, गांजा, मोबाईल, वाहन व रोख असा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणात आरोपींविरुध्द नांदगांव पेठ पोलिस ठाण्यात कलम 20, 22, 29 एनडीपीएस ॲक्टप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले

### या पथकाची कामगिरी

सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, गणेश शिंदे, सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक महेश इंगाले, पोलिस उपनिरीक्षक संजय वानखडे, पोलीस अंमलदार बबलु येवतीकर, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तीक देशमुख, अजय मिश्रा, मनोज ठोसर, संदीप खंडारे, मंगेश शिंदे, संग्राम भोजने, चेतन कराडे, राजीक रायलीवाले, योगेश पवार, सागर ठाकरे, चेतन शर्मा, अनिकेत वानखडे (सायबर), महीला अंमलदार माधुरी साबळे, वर्षा घोंगळे यांनी केली आहे.

# जयस्तंभ चौकातील जयभोले पान मटेरियलच्या दुकानात गोळीबार

## तीन अज्ञातांनी देशी कट्टा चालवून केली तोडफोड







**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.4)**- जयस्तंभ चौकातील जयभोले नामक पान मटेरियलच्या दुकानात शुक्रवारी (दि.4) गोळीबार व तोडफोडीची घटना समोर आली. रात्री सव्वा आठ वाजताच्या सुमारास हा प्रकार घडला. याप्रकरणी पोलीस तीन अज्ञातांच्या शोध घेत आहे.

जयस्तंभ चौकाजवळील जयभोले केंद्र येथे किराणा, पानमटेरीयलचे साहित्य विक्री केली जाते. शुक्रवारी रात्री जयभोले केंद्रांचे संचालक गुरुबक्ष मंगलानी, सागर मंगलानी व एक छुटलानी नामक कर्मचारी असे तिघे उपस्थित होते. त्यावेळी तीन अज्ञात तरुण जयभोले केंद्रात शिरले. त्यांनी 'विक्की मंगलानी' कहा है, असे म्हणत, गुरुबक्ष मंगलानीसोबत वाद केला. दरम्यान एका तरुणाने देशी पिस्तुल काढून दुकानात गोळीबार केला. सुदैवाने गोळी ही फर्निचरला लागली. यानंतर आरोपींनी दुकानाच्या काचा फोडून तोडफोड केली. त्यानंतर तेथून पळ काढला. या घटनेच्या माहितीवरून कोतवालीचे ठाणेदार मनोहर कोटनाके यांच्यासह पोलिसांचा ताफा घटनास्थळी पोहोचला. काही वेळातच डीसीपी गणेश शिंदेंसह मोठा ताफा घटनास्थळी पोहोचला. त्यांनी मंगलानी कुटुंबातील सदस्यांची चौकशी करून, सीसीटीव्हींची पाहणी केली. त्यानंतर आरोपींचा शोध सुरु केला. घटनास्थळावर एक वापरलेल्या गोळीचे वेष्टनही आढळून आले. रात्री उशिरा सागर मंगलानी यांच्या फिर्यादीवरून शहर कोतवाली पोलिसांनी तीन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु केली होती.

### चार ते पाच महिन्यांपूर्वी झाला होता वाद

मिळालेल्या माहितीनुसार, चार ते पाच महिन्यांपूर्वीही अज्ञात तरुणांनी याच दुकानात येऊन तोडफोड केली होती. त्यावेळी व्यवसायीकावर चाकूने हल्ला केला होता. त्यावेळी आरोपींविरुध्द खंडणीचा गुन्हा नोंदविण्यात आला होता. त्याच प्रकरणाशी संबंधाने ही घटना घडल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### प्लॉटच्या व्यवहारातून प्रकार

तीन अज्ञात आरोपींनी जयभोले सेंटरमध्ये येऊन दहशत निर्माण करण्यासाठी व्यवसायीकाशी वाद केला. त्यानंतर एक गोळी झाडली, ती लाकडी फर्निचरला लागली. कुणालाही दुखापत झाली नाही. त्यानंतर आरोपींनी दुकानाच्या काचा फोडल्या. पोलीस आवारातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासत आहेत. तिन्ही आरोपींचा शोध सुरू आहे. प्लॉटच्या व्यवहारातून हा प्रकार घडला आहे.

**गणेश शिंदे, पोलिस उपायुक्त**

# इलेक्ट्रिक एसटी बसेस चार्जिंग स्टेशन तयार

## एकाच वेळी चार्जिंग होणार 17 इलेक्ट्रिक बसेस



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 4)** - एसटीच्या तपोवन कार्यशाळेत 17 इलेक्ट्रिक एसटी बसेस एकाचवेळी चार्ज करता येतील, इतपत सुविधा निर्माण झाली आहे. आता केवळ इलेक्ट्रिक बसेस एसटी महामंडळ केव्हा पाठवणार याचीच प्रतिक्षा सुरू आहे. अमरावती एसटी विभागाने पहिल्या टप्प्यात 25 बसेस मागितल्या आहेत. मात्र, प्रति कि.मी. भाडे दर अद्याप निश्चित होत नसल्याने विलंब लागत आहे. येत्या काही दिवसांत यावर अंतिम शिक्कामोर्तब झाले की, त्यानंतर इलेक्ट्रिक बसेस एसटी डेपोत दाखल होतील, अशी माहिती एसटीच्या विभागीय नियंत्रक कार्यालयाद्वारे देण्यात आली. इलेक्ट्रिक एसटी बसेस जिल्ह्यात दाखल होण्यास किमान 20 दिवस ते एक महिन्याचा कालावधी लागू शकतो. चार्जिंग स्टेशनचे काम सुमारे 8 महिने रखडल्यामुळे नागपूर-अमरावती इलेक्ट्रिक बस सेवा सुरू झाली नाही. कारण ही बस एकदा चार्ज केल्यानंतर किमान 280 ते 300 कि.मी.धावते. परंतु, अमरावती-नागपूर हे अंतर सुमारे 160 कि. मी. असल्याने नागपुरातून अमरावतीत आलेली इलेक्ट्रिक एसटी बस परत पाठवण्याआधी तिला चार्ज करावेच लागेल. तसेच इलेक्ट्रिक बसेस सुरू झाल्यानंतर या बसची अमरावतीहून नागपूरसाठी रात्रीची फेरीच ठेवावी लागेल. नागपुरात पोहोचलेली बस रात्रभर चार्ज होऊन सकाळी निघेल. दिवसा इतर वेळी जर इलेक्ट्रिक बस नागपुरात पाठवली तर तिला चार्ज करण्यासाठी किमान 3 तास चालक, वाहकांना खोळंबून राहावे लागेल. त्यामुळे दिवसभरात एकच फेरी होईल. तसेच चालकाचाही वेळ वाया जाईल, अशी माहितीही विभागीय नियंत्रक कार्यालयाद्वारे देण्यात आली. बस ही एकदा चार्ज केल्यानंतर 280 ते 300 कि.मी. धावते. त्याचप्रमाणे ही पूर्णतः एसी बस असल्यामुळे तिचे भाडे हे शिवशाहीसारखेच राहणार आहे. तसेच संपूर्ण बस चार्ज करण्यासाठी 3 तासांचा कालावधी लागतो. ते बघूनच फेऱ्यांचे नियोजन केले जाणार आहे. अमरावतीत चार्जिंग स्टेशन सुरू झाल्यानंतर जिल्ह्यात प्रथम अचलपूरपर्यंत प्रवासी फेरी सुरू केली जाणार आहे.

### इमारतीचे काम काहीसे शिल्लक

एसटीच्या तपोवन येथील कार्यशाळेत चार्जिंग स्टेशन तयार आहे. केवळ व्यवस्थापन इमारतीचे काम काहीसे शिल्लक आहे. ते पूर्ण झाले की, लगेच इलेक्ट्रिक एसटी बसेसची मागणी केली जाईल. त्या लवकरच मिळतील अशी अपेक्षा आहे.

**नीलेश बेलसरे, विभागीय एसटी नियंत्रक.**

### समता पंधरवडानिमित्त जात प्रमाणपत्र पडताळणीची विशेष मोहिम

**अमरावती** - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंतीनिमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत दि. 1 ते 14 एप्रिल 2025 या कालावधीत समता पंधरवडा राबविला जात आहे. यानिमित्त जात प्रमाणपत्र पडताळणीची विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. समता पंधरवडा कालावधीत इयत्ता इ. 11 वी व 12 वी विज्ञान शाखेतील सन 2025-26 मधील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी सीईटीमार्फत व्यावसायिक अभ्याक्रमात प्रवेश घेणाऱ्या तसेच डिप्लोमा तृतीय वर्षामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी समता पंधरवडा शिबिराचा लाभ घेऊन परिपूर्ण ऑनलाईन अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या उपायुक्त जया राऊत यांनी केले आहे.

# सोसायटी उघडून पद देण्याचे अमीष दाखवून नऊ लाखांनी गंडविले

## गाडगेनगर ठाण्यात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 4)** - यु.के.ए.जी अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी उघडून सहसचिवपद देण्याचे आमीष दाखवून एका व्यक्तीला तब्बल नऊ लाखांने गंडविले. 13 ऑक्टोबर 2023 ते 4 डिसेंबर 2023 या कालावधीदरम्यान हा व्यवहार झाला होता. या फसवणूकीची तक्रार रवींद्र मारोतराव चौधरी (67, रा. राठीनगर, अमरावती) यांनी 3 एप्रिल रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी गुरुवारी रात्री संशयित आरोपी अमोल रमेश खारोळे (42) सह एका महिलेविरुद्ध फसवणूक व विश्वासघाताच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

पोलिस तक्रारीनुसार, अमोल व संबंधित महिलेने दोन वर्षांपूर्वी रवींद्र चौधरी यांची भेट घेऊन सोसायटी उघडण्याची योजना आखली. मी युकेजीसी अर्बन क्रेडिट को-ऑपरेटीव्ह सोसायटी उघडणार असून, त्याकरिता 11 लाखांची आवश्यकता आहे. असे अमोल व त्या महिलेने रविंद्र चौधरींना सांगितले. नेरपिंगळाई येथील एक प्लॉट दाखवून त्यात हिस्सा देणार असून, शिवाय सोसायटीमध्ये सहसचिव हे पद सुद्धा देऊ, असे आश्वासन खारोळे यांनी चौधरी यांना दिले होते. त्यावेळी चौधरींकडून खारोळे यांनी 11 लाख रुपये घेतले होते. त्यापैकी 2 लाख 10 हजार रुपये फर्निचरसाठी खर्च करण्यात आले, तर उर्वरीत 8 लाख 90 हजार रुपये रवींद्र चौधरी यांनी खारोळेंना दिले. त्यानंतर चौधरी यांनी दोन महिन्यांनी धर्मदाय आयुक्त कार्यालयात जाऊन सोसायटीबाबत चौकशी केली असता, अशा प्रकारची कोणतिही संस्था अस्तित्वात नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे चौधरी यांच्या लक्षात आले. त्यामुळे रवींद्र चौधरी यांनी खारोळेंना पैसै परत मागितले. त्यावेळी खारोळेने दिलेल्या धनादेशाचेही अनादरण झाले. त्यामुळे खारोळे यांनी 8 लाख 90 हजार रुपयांनी फसवणूक केल्याचा आरोप रवींद्र मारोतराव चौधरी यांनी तक्रारीतून केला आहे. त्यानुसार पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## सरकारी स्वस्त धान्य दुकानांची तपाससी

# वर्षभरात 9.59 लाख रूपयांचा दंड वसूल

## दहा दुकानांच्या बाबतीत गंभीर दोष



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 4)** सरकारी स्वस्त धान्य दुकानातून नागरिकांना वितरित केल्या जाणार्या धान्याची अफरातफर करण्यात आली. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने दहा महिन्यात 61 दुकानांची तपासणी केली. त्यातील अनियमितता करणार्या दुकानदारांकडून 9 लाख 59 हजार 545 रूपयांचा दंड वसूल केला आहे.

रेशनची उचल करणार्या नागरिकांकडून प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाने ही कारवाई केली. दरम्यान तक्रारी गंभीर असल्यामुळे कार्यालयाच्या अधिकारी‍कर्मचार्यांनी जिल्ह्यातील 61 दुकानांची तपासणी केली. या दरम्यान 32 दुकानांमध्ये किरकोळ दोष दिसून आले. तर दहा दुकानांच्या बाबतीत गंभीर दोष दिसले. त्यामुळे सर्वांवर कारवाईचा बडगा उगारला. या सर्वांबाबत दुकाने वेळेत उघडी न ठेवणे, घोषित नियमानुसार वितरण न करणे, ग्राहकांना सौजन्यपूर्ण वागणूक न देणे अशा तक्रारी ग्राहकांनी केल्या होत्या. त्यानुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाने दहा दुकानांची तपासणी केली. त्याचवेळी 51 दुकानांना अघोषित वेळी भेटी देऊन तेथील कामकाज तपासले. यावेळी 31 दुकानदारांनी किरकोळ चुका केल्याची निरीक्षणे नोंदवली. त्यामुळे त्यांच्याकडून 9 लाख 59, 545 रूपयांचा दंड वसूल केला. जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांच्या नेतृत्वात संबंधित यंत्रणेने ही कारवाई केली. तत्पूर्वी नैसर्गिक न्यायाचा भाग म्हणून संबंधितांकडून खुलासाही मागविण्यात आला होता.

### अनियमितता करणाऱ्या 10 दुकानांचे लायसन्स रद्द

धान्य वितरणात अनियमितता करणार्या तब्बल 10 दुकानांची अनुज्ञप्तीही (लायसन्स) रद्द केली. लायसन्स रद्द केल्यामुळे ही दुकाने बंद झाली आहेत. त्यामुळे त्या दुकानांशी संबंधित सुमारे अडीच हजार रेशनकार्ड धारकांना शेजारच्या दुकानांशी जोडले आहे. त्यांना त्या दुकानांमधून रेशन पुरवले जात आहे.


सावजी बँक **सुंदरलाल सावजी अर्बन को-ऑप. बँक लि; जिंतूर**

**मुख्य कार्यालय : ए.पी.एम.सी. मार्केट यार्ड, जिंतूर - ४३१५०९ जि. परभणी**

**परिशिष्ट IV**

**(नियम 8(1) पहा)**

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेतलेची नोटीस**

जसे की,

खाली स्वाक्षरी करणार हे सुंदरलाल सावजी अर्बन को-ऑप. बँक लि: जिंतूर मुख्य कार्यालय, जिंतूर जि. परभणी सेक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांसियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरीटी इन्ट्रेट ॲक्ट 2002 केंद्रीय कायदा 2002 नं.54 चे अंतर्गत प्राधिकृत अधिकारी आहेत व त्यांनी सदर कायद्याचे कलम 13 (2) व नियम 9 सेक्युरीटी इन्ट्रेस्ट इन्फोर्समेंट 2002 नुसार खालील दिनांक 20 औगस्ट, 2024 रोजी बँकेचे कर्जदार श्री. राजेंद्र वासुदेवराव चिकटे व श्री. करण राजेंद्र चिकटे यांना नोटीसी मध्ये नमुद केलेली रक्कम रु.352166/- (अक्षरी रु.तीन लाख बावन हजार एकशे सहासष्ट केवळ 60 दिवसांच्या आंत भरणा करण्यासाठी डिमांड नोटीस दिली.

सदर कर्जदारांनी वरील नोटीसी मध्ये नमुद केलेल्या रक्कमेचा भरणा नकेल्यामुळे सदर नोटीसीद्वारे संबंधीत कर्जदार व सर्व जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, खालील सही करणारे त्यास सदरहू कायदयाचे कलम 13(4) व नियम 9 नुसार त्यांना असलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील नमुद स्वावर मालमत्तेचा सांकेतीक ताबा घेतलेला आहे. कर्जदार व सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी सदर स्थावर मालमत्ते संदर्भात कोणताही खरेदीचा व्यवहार किंवा करार इत्यादी करु नये केल्यास त्यावर सुंदरलाल सावजी अर्बन को-ऑप बँक लि., जिंतुर शाखा अंजनगाव सुर्जी बँकेचे कर्ज रु.352166/- (अक्षरी रु. तीन लाख बावन हजार एकशे सहासष्ट केवळ) व त्यावर पुढे होणारे व्याज याचा बोजा असेल.

तारणदार : **तारणदार व कर्जदार श्री. राजेंद्र वासुदेवराव चिकटे** यांचे नावाने असलेली व बँकेने सांकेतीक ताबा घेतलेल्या मालमत्तेचा तपशील : ग्राम पंचायत बोराळा धनेगाव ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती. वार्ड नं.02 घर नं. 317 एकुण क्षेत्रफळ 360 स्के. फुट आहे. उपनोंदणी कार्यालय, अंजनगाव सुर्जी जि. अमरावती.

चतु: सिमा :

पुर्वेस -सरकारी रस्ता पश्चिमेस - श्री. दयाराम भिवटे यांचे घर, दक्षिणेस - श्री. किरण सरोदे यांचे घर, उत्तरेस -सौ. अरुणा चिकटे यांचे घर

तारणदार : **तारणदार व जामिनदार सौ. अरुणा राजेंद्र चिकटे** यांचे नावाने असलेली व बँकेने सांकेतीक ताबा घेतलेल्या मालमत्तेचा तपशील: ग्राम पंचायत बोराळा धनेगाव ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती. वार्ड नं.02 घर नं.318 एकुण क्षेत्रफळ 900 स्के. फुट आहे. उपनोंदणी कार्यालय, अंजनगाव सुर्जी जि. अमरावती.

**चतु:सिमा :** पुर्वेस - सरकारी रस्ता, पश्चिमेस - श्री. दयाराम भिवटे यांचे घर, दक्षिणेस - श्री. राजेंद्र चिकटे यांचे घर, उत्तरेस -सरकारी रस्ता

दिनांक : 10.01.2025

स्थळ : अंजनगाव सुर्जी.

**स्वाक्षारीत**
**(एल.आर. खंडागळे)**
**प्राधिकृत अधिकारी**
**सुंदरलाल सावजी अर्बन को-ऑप, बँक लि., जिंतुर**


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी मशाल आंदोलन

## 11 एप्रिलच्या रात्री 12 वाजता सर्व आमदारांच्या घरासमोर मशाली पेटवून आंदोलन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूरबाजार ( दि. 4 )** – आश्वासन देऊन ही शेतकऱ्यांच्या कर्जमाफी मुद्यावरून राज्य सरकारने घुमजाव केले. अशा विश्वासघातकी सरकारला वठणीवर आणण्यासाठी राज्यभर सरकार विरोधात रान पेटविण्याचा इशारा माजी आमदार तथा प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी दिला आहे. 11 एप्रिलच्या रात्री 12 वाजता सर्व आमदारांच्या घरासमोर मशाली पेटवून आंदोलन केले जाणार आहे.

या आंदोलनाला मुर्त रूप देण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाची 30 मार्चला एक राज्यस्तरीय बैठक घेण्यात आली. या बैठकीत पक्ष संघटनावाढीसोबत मशाल आंदोलनावर ही चर्चा करण्यात



आली. या बैठकीला प्रकारचे राज्यभरातील प्रमुख नेते, पदाधिकारी, सर्व जिल्हा प्रमुख व तालुका प्रमुख उपस्थितीत होते. शेतकर्यांच्या कर्जमाफी आंदोलनाचा पहिला टप्प्यात महात्मा फुले यांचे जयंतीचे औचित्य साधून 11 एप्रिलला रात्री राज्यातील प्रत्येक आमदारांच्या घरासमोर मशाली पेटवून आंदोलन करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. विधानसभा निवडणुकीच्या वेळेला महायुतीच्या नेत्यांनी, शेतकर्‍यांचा सात / बारा कोरा करणार असल्याचे जाहीर केले होते. या आश्वासना मुळे शेतकऱ्यांनी महायुतीला भरभरून मतदान करून एकहाती सत्ता बहाल केली. मात्र सत्ता हाती येताच राज्याच्या अर्थमंत्र्यांनी पुढील तीन वर्ष तरी, शेतकर्‍यांची कर्जमाफी शक्य नाही. असे सांगुन शेतकर्‍यांचा विश्वासघात केला. त्यामुळे राज्यभरातील शेतकर्‍यांमध्ये राज्य सरकारच्या विरोधात असंतोष निर्माण झाला आहे. त्याचीच दखल घेऊन माजी आमदार बच्चू कडू यांनी शेतकर्‍यांच्या कर्जमाफीसाठी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सरकार विरोधात आंदोलनाचा शंखनाद केला आहे. गुढीपाडव्याला झालेल्या प्रहारच्या या बैठकीत



शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन देऊन महायुती सत्तेत आली. सत्तेच्या सिंहासनावर आरूढ झाल्यानंतर महायुतीची कर्जमाफीच्या बाबतीत भाषाच बदलली. हा शेतकर्‍यांचा महायुतीने केलेला विश्वासघातच आहे. महायुती सरकारच्या या विर्श्वासघातकी प्रवृत्ती विरोधात प्रहार जनशक्ती पक्षाकडून मशाल आंदोलन करण्यात येत आहे.

**बच्चू कडू,**
**अध्यक्ष जनशक्ती पक्ष तथा माजी आमदार**

शेतकर्‍यांच्या कर्जमाफीसोबत शेती संबंधी इतरही प्रश्नावर राज्यव्यापी जन आंदोलन करण्याचा ही निर्णय घेण्यात आला .यात शेतकर्‍यांचा वाढता उत्पादन खर्च कमी व्हावा. यासाठी शेतीची मजूरांकरवी होणारी सर्व कामे, रोजगार हमी योजनेअंतर्गत शासनाव्दारे करण्यात यावी. ही प्रहार जनशक्ती पक्षाची पूर्वीची मागणी रेटून धरण्याचा निर्णय ही या बैठकीत घेण्यात आला आहे. या आंदोलनाची रुपरेषा आखण्याकरिता बच्चु कडू यांनी मुंबई गाठली असल्याची माहिती आहे.

# दापोरीतील 'जलजीवन'च्या योजनेला वीज जोडणी मिळता मिळेना!

## 8 दिवसात वीज कनेक्शन न मिळाल्यास आंदोलनाचा ईशारा!

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी ( दि. 4 )** – मोर्शी तालुका आधीच ड्रायझोनमध्ये असल्यामुळे पाणी टंचाईची दाहकता आहे. तसेच जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे मार्गी लावण्याचे आदेश आहेत. या आदेशानुसार जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने दापोरी येथील नवीन पाणी पुरवठा योजना 1 कोटी 81 लक्ष रुपये खर्च करून पूर्ण केली. परंतू वीजबिल न भरल्यामुळे जलजीवन मिशनच्या पाणीपुरवठा योजनांचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण होऊनही मोर्शी तालुक्यातील दापोरी येथील पाणी पुरवठा योजनेला महावितरण कंपनीतर्फे वीज जोडणीच मिळत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे गावाला पाणी पुरवठा सुरळीत होत नसल्याचा आरोप ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी केला आहे.

मोर्शी तालुक्यातील ग्राम पंचायत कार्यालय दापोरी येथील नवीन पाणी पुरवठा योजना मंजूर झाली. त्या योजनेचे काम पूर्ण



झालेले असून महावितरण कंपनीकडे मागील 1 वर्षापासून सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेचे कनेक्शन सुरु करून पाणी पुरवठा सुरळीत चालू ठेवण्याकरिता पाठपुरावा केला, तरीसुद्धा दापोरी येथील पाणी पुरवठा योजनेला आजपर्यंत वीज कनेक्शन मिळू शकलेले नाही. त्यामुळे दापोरी गावामध्ये पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झालेली आहे. दापोरी गावामध्ये 2 ते 3 दिवसानंतर पाणी पुरवठा केला जाते. त्यामुळे गावामध्ये भयंकर पाणी टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे गावातील नागरिकांमध्ये रोष निर्माण होत आहे. शासनाने जल जीवन मिशन अंतर्गत कोट्यावधी रुपये मंजूर करून पाणी पुरवठा योजना उभी केली असतांना पाणी पुरवठा योजनेला वीज कनेक्शन मिळत नाही. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाचे उप विभागीय अभियंता, उप विभागीय अधिकारी, गट विकास अधिकारी यांना निवेदन देऊन दापोरी येथील सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेच्या वीज कनेक्शनची समस्या निकाली काढण्याची मागणी केली आहे.

# तडीपार आरोपीला अटक

## खोलापुरी गेट पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 4 )** – खोलापूरी गेट पोलिसांनी तडिपारीतील वॉन्टेड असणार्या एका आरोपीला 3 एप्रिल रोजी अटक केली. मयूर राजेश चाळीसगावकर (वय 32, रा.वल्लभ नगर न.2, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. आरोपीविरुध्द खोलापुरी गेट पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 303(2), 3(5) सहकलम 142 महाराष्ट्र पोलिस कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असून, तो पोलिस रेकॉर्डवर



पाहिजे असलेला आरोपी होता. त्यामुळे पोलिसांनी तपासाला गती देत आरोपी मयूर राजेश चाळीसगावकर याला अटक करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलिस आयुक्त जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गौतम पातारे, क्राईमचे पोलिस निरीक्षक राजेंद्र होळकर, सहायक पोलिस उपनिरीक्षक प्रवीण खैरकर, पोलिस हवालदार राम लोखंडे, देवेंद्र कोठेकर, अमोल नकाशे, मोहम्मद इरफान यांनी केली.

## 'पीडीएमसी' त 'लैंगिक छळाला प्रतिबंध' विषयावर व्याख्यान

**अमरावती** – येथील शिवाजी शिक्षण संस्थाद्वारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयात तक्रार समितीमार्फत लैंगिक छळाला प्रतिबंध विषयावर डॉ. रम्या निसत यांचे व्याख्यान गुरुवार, 22 मार्च रोजी महाविद्यालयाचे अधिक्षता डॉ. अनिल देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आले होते. डॉ. रम्मया निसत यांनी महिलांविषयीच्या कायद्याचे महत्व, लहान मुलांचे लैंगिग शोषण कसे थांबवू शकतो, याबाबत सविस्तर माहिती दिली.

# एकाच बचत गटांना 8 वर्षांपासून मिळत व्यापारी संकुलातील दुकाने




## स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी ( दि. 4 )** – सुवर्ण जयंती ग्राम स्वराज्य योजनेअंतर्गत स्वयंसहाय्यता बचत गटांना व्यवसाय उपलब्ध व्हावा, या उद्देशाने मुलभूत सुविधेअंतर्गत व्यापार संकुलाचे वाटप करण्यात आले आहे. परंतू गेल्या 8 वर्षांपासून एकाच बचत गटांना व्यापारी संकुलातीत दुकाने मिळत आहे. याकडेस्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष केले असल्याचा आरोप आता नागरिक करू लागले आहे.

सुवर्ण जयंती ग्राम स्वराज्य योजनेअंतर्गत स्वयंसहाय्यता बचत गटांना व्यवसाय उपलब्ध व्हावा, या उद्देशाने मुलभूत सुविधेअंतर्गत व्यापार संकुलाचे वाटप करण्यात आले आहे. आदेश पत्राद्वारे (2104) पंचायत समिती अधिकारी गटविकास अधिकारी यांनी तालुका स्तरावरील गावांना दिले. त्याप्रमाणे अंजनगाव बारीतील पात्र बचत गटांसाठी व्यापारी संकुलात 5 गाडे दुकानांचे पक्के बांधकाम स्थानिक प्रशासनाने केले, तसे आदेश गटविकास अधिकारी यांच्यामार्फत प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा पत्राद्वारे ठराव मंजूर (2015) करून स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाने व्यापारी संकुल उभे करून स्वयंसहाय्यता बचत गटांना व्यवसाय सुरू करून स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने सुरू करण्यात आले.

व्यापारी संकुलातील एकूण 5 गाडे दुकाने गावातील प्रत्येक बचत गटांना वाटप करताना मासिक 200 रुपये भाडे व 11 महिन्यांच्या करारावर देण्याचे ठरविण्यात आले. तसेच इमारती देखभाल व दुरुस्ती खर्च न करता गाडे दुकानात विद्युत पुरवठा, पाणी व्यवस्था, ग्रामपंचायत टॅक्स कर व इतर अनुषंगिक खर्च स्वयंरोजगार स्वयंसहाय्यता




### ही आहेत ती पाच महिला बचत गट

सावित्रीबाई फुले बचत गट, जिजाऊ महिला बचत गट, संकल्प बहुउद्देशीय बचत गट, यशोदा महिला बचत गट व अपंगांसाठी राखीव बचत गट असे पाच बचत गट गेल्या 8 वर्षांपासून ही दुकाने चालवत आहे. जेव्हा ही दुकाने सुरूवातीला या पाच बचत गटांना देण्यात आली. तेव्हा लेखी स्टॅम्पवर बचत गटाच्या अध्यक्ष यांच्या सह्यानिशी व नियमावलीचे पालन करण्याचे आदेश संबंधित यंत्रणेने बचत गटांना दिले असतानाही तात्कालीन सरपंच्यांनी यातील दोन गटांच्या अध्यक्षांच्या सह्या न घेताच स्टॅम्प जमा करुन ही दुकाने देण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

### प्रशासनाची दिरंगाई का. ? महिलावर्गाचा सवाल. ?

या सर्व प्रकरणाबाबत माहिती अधिकारात माहिती मागविण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायत सचिव यांच्याशी चर्चा करण्यात आली असता बचत गटांना वारंवार ( दोनदा) नोटीसही देऊनही ही व्यापारी संकुलातील दुकाने खाली करण्यास टाळाटाळ करत असल्याचे समजते. यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय न झाल्यास कायदेशीर कठोर कार्यवाही करण्यास स्थानिक ग्रामपंचायत दिरंगाई का करत आहे. असा सवाल गावकरी व बचत गट महिलावर्गानी केला आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनाने त्वरीत या प्रकरणी दिरंगाई करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी सर्वत्र होत आहे.

गटांनी करावा, असे दिलेल्या पत्रात स्पष्ट नमूद करण्यात आले होते. त्यानुसार स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाकडून गावात दवंडी देऊन बांधलेल्या पाच व्यापारी संकुलातील दुकानांचे वाटप 2017 मध्ये लेखी स्टॅम्प करार करून व पं.सं.सुवर्ण ग्राम स्वयंरोजगार योजनेअंतर्गत बचत गटांना व्यवसायासाठी देण्यात आले. परंतु गेल्या आठ वर्षांपासून त्याच पाच स्वयंसहाय्यता गटाकडून ही दुकाने चालवल्या जात आहे. त्यामुळे गावातील इतर बचत गटांतील महिला वर्गाना या दुकानांचा लाभ मिळत नाही. याविषयी गावातील बचत गटांच्या तक्रारी अनेक दिवसांपासून महिला वर्गांनी स्थानिक प्रशासनाकडे केल्या आहेत. ज्या स्वयं सहाय्यता बचत गटांनी ठरलेल्या करार तत्वावर ही दुकाने देण्यात आली, तेच बचत गट ही दुकाने चालवत आहे. काही बचत गटांना तर स्वत: ही दुकाने न चालवता बचत गटाच्या नावावर (पोट भाडेकरू) ही दुकाने चालवायला घेत आहे, असे बचत गट बळजबरीने दुकान चालवणाऱ्याकडून आर्थिक पिळवणूक करत होत आहे. याकडे स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे महिला वर्गाला आपला व्यवसाय करण्यापासून वंचित रहावे लागत आहे. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याने याविषयी लक्ष देऊन हा प्रश्न सोडवण्याची मागणी गावातील बचत महिलांकडून केल्या जात आहे.

# अचलपूर उपजिल्हा रुग्णालय अधीक्षक डॉ.सुरेंद्र ढोले यांची तक्रार

## खाजगी रुग्णालय चालवित असल्याचा आरोप

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपुर ( दि. 4 )** – अचलपूर उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. एस.डी. ढोले यांच्याविरुद्ध खाजगी रुग्णालय चालविण्याच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी अमरावतीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयाने चौकशी समिती गठीत केली आहे.

या संदर्भात सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक यांनी 27 मार्च रोजी एक पत्र काढले आहे. या पत्रानुसार, जिल्हा परिषदेच्या आरोग्य अधिकार्‍यांकडून अमरावती येथील जिल्हा परिषद आरोग्य विभागाला डॉ. ढोले यांच्याविरुद्ध तक्रार प्राप्त झाली आहे. या तक्रारीनुसार, डॉ.




एस.डी. ढोले हे अचलपुर येथील उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक असून, त्यांनी सरकारी रुग्णालयातील कर्तव्यांकडे दुर्लक्ष करून स्वत:चे खाजगी रुग्णालय चालविले असल्याचे नमूद आहे. तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा सामान्य रुग्णालयाकडून यांनी तात्काळ चौकशी समिती गठीत केली आहे. या समितीमध्ये डॉ. विनोद पवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. वर्षा श्रीखंडे, वैद्यकीय अधिकारी वर्ग-1 आणि नितीन फांडे, कनिष्ठ लिपिक यांचा समावेश आहे. समितीला तक्रारीची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तक्रार पत्राच्या प्रतीची नोंद घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली आहे. या प्रकरणामुळे जिल्हा आरोग्य विभागात खळबळ उडाली असून, चौकशी समितीच्या अहवालानंतर पुढील कारवाईचा निर्णय घेतला जाईल.

# सरकारी सर्व्हिस लाईनवरील अतिक्रमण हटविले

## महापालिका पथकाची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 4 )** – बडनेरा झोन क्रमांक 4 मधील अकोली रोड परिसर स्थित साईनगरातील एका सर्व्हिस लाईनवर करण्यात आलेले अतिक्रमण 3 एप्रिल रोजी महापालिकेच्या पथकाने हटविल्याने खळबळ उडाली आहे. सातुर्णा प्लॉट क्रमांक 120 च्या सर्वे क्रमांक 33 मध्ये विजयराव यावले यांचा प्लॉट असून त्यांनी सरकारी सर्विस गल्लीमध्ये घराचे पहिला मजला आणि खालचे दुकान अनधिकृत बेकायदेशीरपणे बांधले होते. या अतिक्रमणाबाबत महापालिके कडून यावले यांना नोटीस बजावण्यात आली होती. त्यानंतर उपायुक्त प्रशासन डॉ.मेघना वासनकर यांच्या आदेशाने



नियमानुसार अतिक्रमण पथक प्रमुख श्याम चावरे, उपअभियंता तायडे, सहाय्यक अभियंता विवेक देशमुख, कनिष्ठ अभियंता अमित रोंगे, निरीक्षक शैहबान यांच्या उपस्थितीत हे अतिक्रमण पाडण्यात आले. राजापेठ पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी यांच्या सरंक्षणात सदर अतिक्रमण पाडण्याची कार्यवाही करण्यात आली.

# आता पोलिसांचे रामनवमीच्या बंदोबस्तावर लक्ष

## कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने बैठक



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 4 )** – आगामी श्रीराम नवमी, महाविर जयंती व हनुमान जयंती उत्सव अमरावती शहरात मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पोलिसांनी बंदोबस्ताचे नियोजन सुरु केले आहे. यासाठी 3 एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

6 एप्रिल रोजी श्रीराम नवमी, 10 एप्रिल रोजी महाविर जयंती व 12 एप्रिल रोजी हनुमान जयंती उत्सव साजरा होत आहे. सदर उत्सवादरम्यान कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये, याकरीता पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस आयुक्तालय कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रामनवमी, महाविर जयंती व हनुमान जंयती उत्सव समितीचे पदाधिकारी, आयोजन समिती, स्थानिक राममंदिरावर होणारे उत्सवाचे प्रमुख, प्रतिष्ठीत नागरी, पोलीस आयुक्तालय स्तरावरील शांतता समिती सदस्य, महानगरपालीका व विद्युत विभागाचे प्रशासकीय प्रमुख तसेच सर्व पोलीस अधिकारी यांची उपस्थिती होती. या बैठकीमध्ये उपस्थित सदस्यांनी रामनवमी, महाविर जयंती व हनुमान जंयती उत्सव आनंदात साजरा होण्यासाठी काही मुद्दे उपस्थित केले. त्यावर पोलीस आयुक्त सांगितले की, अमरावती शहर अंत्यत शांतताप्रिय असून येथील हिंदू व मुस्लिम नागरीकांनी शहरातील शांतता अबाधीत ठेवण्याकरिता नेहमीच सहकार्य केले आहे. त्यामुळे, यापुढेही अमरावती शहर वासियांकडून अशाच सहकार्याची अपेक्षा आहे. त्यांनी आपसामध्ये भाईचारा ठेवून शहरात कोणताही अनुचीत प्रकार होणार नाही, यादृष्टीकोनातुन एकजुट राहुन शहरात शांतता कायम ठेवावी, याकरिता ही बैठक घेण्यात आली.

### अफवांवर विश्वास ठेऊ नका

बैठकीमध्ये रामनवमी, महाविर जयंती व हनुमान जंयती उत्सवादरम्यान शोभायात्रेमध्ये कोणीही शस्त्र अथवा ज्वलनशिल पदार्थ सोबत बाळगणार नाही, याबाबत सुचित करण्यात आले. शहरातील राम मंदिर, हनुमान मंदिराची साफसफाई करण्यात यावी, याबाबत महानगर पालीका अधिकारी यांना निर्देश देण्यात आले. तसेच सण-उत्सव काळात शहरातील पाणीपुरवठा, विजपुरवठा खंडीत होणार नाही याबाबत विज वितरण विभागास सुध्दा सुचित करण्यात आले आहे. त्यांनी सर्व उपस्थितांना कोणत्याही अफवेवर विश्वास ठेवू नये, सोशल मिडीयावर प्रकाशित होणारे माहितीबाबत खात्री करावी त्याची माहिती पोलीसांना दयावी, समाजात तेढ निर्माण करणारे पोस्ट व्हायरल करणा-याची माहिती घेवून पोलीसांना कळवावे. सोशल मिडीयावर प्रकाशित होणारे पोस्ट करणारे व्यक्तीवर सायबर पोलीसतर्फे करडी नजर राहील. सोशल मिडीयाव्दारे पसरणा-या अफवांवर विश्वास ठेवु नये, असे आवाहन करण्यात आले.

### शांतता भंग करणाऱ्यांवर होणार कारवाई

पोलीस विभागाकडून शहरातील शांतता भंग करणारे समाजकंटकांची माहिती संकलीत करण्यात आली आहे. त्यांच्यावर कठोर करवाई करण्यात येणार आहे. तसेच कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करणार्यांविरूध्द सुध्दा कठोर कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे. काही तरुण मंडळी अफवेमुळे, सोशल मिडीयावर प्रकाशित होणारे पोस्ट मुळे व त्यांना खोटे प्रोत्साहन मिळत असल्याने त्यांच्याकडून अनुचीत प्रकार घडुन येतो त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल होतात, त्यामुळे सर्वांनी आपल्याकडील तरुण मंडळींचे समुपदेशन करून त्यांना योग्य सुचना दयाव्यात असे सुचीत केले.

# त्या 250 तक्रार पेट्या झाल्या शोभेच्या वस्तु

## तत्कालीन पोलीस अधीक्षकांची यशस्वी संकल्पना धुळखात



बादल डकरे




**चांदूर बाजार,( दि.4 ) –** संपुर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या वनपरिक्षेत्र अधिकारी दीपाली चव्हाण आत्महत्या प्रकरणानंतर महिला आणि बालकांवरील लैंगिक अत्याचारासारख्या घटनांना आळा घालण्यासाठी तत्कालीन पोलीस अधीक्षक (ग्रामीण) डॉ.हरीबालाजी.एन यांनी जिल्हाभरात तक्रार पेट्या लावल्या होत्या. या तक्रार पेटीमधील माहीती अगदी गुप्त ठेवली जायची. डॉ.हरीबालाजी यांची ही संकल्पना अवघ्या काही दिवसातच यशस्वी झाली होती. त्यांना अनेक गुप्त तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, ज्या आधारे त्यांनी अनेक कारवाया केल्या. मात्र ही संकल्पना त्यांच्या बदलीनंतर आतापर्यंत धुळखात पडून आहे. त्यांच्या निर्देशावरुन लावण्यात आलेल्या 250 तक्रार पेट्या आजही धुळखात पडून आहेत.

बाल लैंगिक अत्याचार व स्त्री अत्याचाराच्या गुन्ह्यांना वेळीच आळा घालण्याकरिता तत्कालीन पोलीस अधीक्षक डॉ.हरिबालाजी यांनी रक्षादीप उपक्रम सुरू केला होता. अत्याचाराचा वेळीच प्रतिकार कसा करावा, कायद्याने महिलांना दिलेले संरक्षण आदींबाबत माहितीपटाच्या माध्यमातून लोकशिक्षण 15 हजार पेक्षा अधिक विद्यार्थी याना याची माहिति देण्यात आली होती. सोबतच गुप्त तक्रार करण्याकरिता गावागावात तक्रार पेट्या लावण्यात आल्या होत्या. संबंधितांना तक्रार करण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलीस दलाने प्रत्येक पोलीस ठाण्यात तसेच शाळा व महाविद्यालयांमध्ये तक्रारपेटी उपलब्ध करून दिली होती. अन्याय, अत्याचाराला तोंड देणाऱ्या, आपल्यासमोर गुन्हेगारी प्रवृत्तीची घटना घडत असल्यास तक्रारपेटीत तक्रार नोंदवावी, अशी माहिती यावेळी सेमिनारमध्ये सहभागी विद्यार्थ्याना देण्यात आली होती. मात्र या तक्रार पेट्या ग्रामीण पोलीस स्टेशनमधील शोभेच्या वस्तु झाल्याच्या दिसत आहे.

### अनेक गुन्हांची उकल

तक्रार पेटीमध्ये मिळालेल्या तक्रारींच्या आधारे अनेक गुन्ह्याची उकल होत होती. या तक्रारी सोडविण्याचे काम तत्कालीन ग्रामीण पोलीस अधीक्षक हरि बालाजी.एन यांच्या कार्यकाळ मध्ये करण्यात आले होते. तक्रारकर्ता ते थेट पोलीस अधिक्षक असे या तक्रारीचे स्वरुप असायचे. या पेट्यांच्या माध्यमातून अनेक ठाणेदारांचे पितळ उघडे पडले होते. कदाचित पोलीस विभागातील इतर अधिकाऱ्यांना डोकेदुखी झाल्याने या तक्रार पेट्या फक्त शो पीस करुन ठेवल्या आहेत.

### नराधम शिक्षक आला होता पुढे

या तक्रार पेटीमध्ये पथ्रोट च्या एका अल्पवयीन विद्यार्थीनीने आपल्याशी अश्लिल चाळे करणाऱ्या एका शिक्षकाची तक्रार टाकली होती. संस्थाचालकाचा मुलगा असलेल्या या शिक्षकाला पोलीसांनी ताब्यात घेवून इतर विद्यार्थीनींचे बयाण नोंदविल्यावर हा नराधम इतरही विद्यार्थीनींशी असा वागत असल्याचे पुढे आले होते. त्यानंतर या शिक्षकाविरुध्द पोस्को अंतर्गत गुन्हे दाखल करुन त्याला अटक करण्यात आली होती.

### एसपी विशाल आनंद यांनी घ्यावा पुढाकार

या उपक्रमाबद्दलची माहिती घेण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद पुढाकार घेऊन तो उपक्रम पुन्हा सुरू करावा. अशी मागणी ग्रामीण भागातून होत आहे. पोलीस अधीक्षक डॉ.हरी बालाजी यांनी यांच्या या उपक्रम मुळे त्यावेळी अनेक शोषित आणि अन्यायग्रस्त नागरिकांना न्याय मिळवून दिला होता हे मात्र नक्की.

## कमांडोंना 'आयरन मॅन' च्या टीप्स




**अमरावती –** आयरन मॅन हा आंतरराष्ट्रीय किताब पटकाविणारे फोर्स 1 चे अतिरिक्त पोलीस महानिदेशक (एडीजी) कृष्ण प्रकाश हे गुरुवारी अमरावती शहरात आले होते. कमांडोंच्या विशेष चाचणी दरम्यान त्यांनी पोलीस आयुक्तालयामध्ये कमांडोंना टीप्स देत आपल्या फिटनेसवर लक्ष्य देण्याचे निर्देश दिले. त्यांनी प्रत्येक तीन महिन्यात घेण्यात येणाऱ्या अंतर्गत चाचणी परीक्षेमध्ये 75 टक्के पेक्षा कमी गुणक मिळवणाऱ्या कमांडोंची खांदेपालट करण्याचेही निर्देश दिले. यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस अधीक्षक (ग्रामीण) विशाल आनंद, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सागर पाटील सह अन्य पोलीस अधिकारी उपस्थित होते.

# मीटर रिडर कर्मचाऱ्याचे भविष्य अधांतरी

- प्रीपेड इलेक्ट्रिक स्मार्ट मीटरला हायकोर्टात आव्हान
- विदर्भ वीज ग्राहक संघटनेची जनहित याचिका

महासागर प्रतिनिधी

**परतवाडा,( दि.4 ) –** स्मार्ट मीटरविरुद्ध विदर्भ वीज ग्राहक संघटनेच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. हे मीटर लावण्याचा निर्णय मनमानी पद्धतीचा आहे, असा गंभीर आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

राज्यामध्ये गेल्या 20 वर्षांत तीन वेळा वीज मीटर बदलविण्यात आले आहेत. सर्वात आधी इलेक्ट्रोमॅग्नेटिक मीटर होते. त्यानंतर ग्राहकांना इलेक्ट्रॉनिक मीटर देण्यात आले. पुढे ते मीटर बदलवून डिजिटल मीटर लावण्यात आले. आता ग्राहकांवर स्मार्ट मीटर थोपविण्यात येणार आहेत. त्याकरिता केंद्र सरकारने 60 व राज्य सरकारने 40 टक्के अनुदान मंजूर केले आहे. सध्या या मीटरची काहीच गरज नाही.



सर्वांचे डिजिटल मीटर चांगल्या व चालू अवस्थेत आहे. असे असताना स्मार्ट मीटर लावल्यास सार्वजनिक निधीचा अपव्यय होईल. चालू डिजिटल मीटर कचऱ्यात फेकावे लागतील. त्यामुळेही आर्थिक नुकसान होईल. याशिवाय ग्राहकांना विविध प्रकारचा मनस्ताप सहन करावा लागेल, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. पूर्ण माहिती रेकॉर्डवर आणण्याचे निर्देश न्यायमूर्तीद्वय नितीन सांबरे व वृषाली जोशी यांच्यासमक्ष सुनावणी झाली. याचिकेत आवश्यक माहिति दिली नसल्याचे आढळ्यामुळे न्यायालयाने केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाचे स्मार्ट मीटर लावण्याचे निर्देश, पॉवर फायनान्स कॉर्पोरेशनने वीज पुरवठ्याची गुणवत्ता वाढविण्यासाठी सुधारित वितरण क्षेत्र योजना, स्मार्ट ग्रीड मिशन गाइडलाइन्स, एमईआरसी सप्लाय रेग्युलेशनची माहिती 16 एप्रिलपर्यंत रेकॉर्डवर आणण्याचे निर्देश याचिकाकर्त्यांना दिले.

### असे आहेत इतर आक्षेप

स्मार्ट मीटर लावण्याचा निर्णय घेण्यापूर्वी आवश्यक अभ्यास केला नाही. यासंदर्भात कोणताही अहवाल नाही, स्मार्ट मीटरचा रिचार्ज संपल्यानंतर वीज पुरवठा बंद होईल. रिचार्ज करण्याची तलवार डोक्यावर राहील, ऑनलाइन व्यवहार करणे सर्वांना शक्य नाही. प्रत्येकाकडे स्मार्ट फोन नाहीत. तसेच, या निर्णयामुळे मीटर रिडिंग व वीज बिल वितरित करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या जातील. असेही याचिकेमध्ये सांगण्यात आले आहे.

# वाठोडा बु. गावाला जोडणारे दोन्ही मुख्य रस्ते उद्ध्वस्त

## नागरिकांचा प्रशासन व लोकप्रतिनिधींवर रोष

महासागर प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे,( दि.4 ) –** तालुक्यातील वाठोडा बु. गावाच्या रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, ग्रामस्थ प्रचंड त्रस्त झाले आहेत. वाठोडा गाव मुख्यत: दोन प्रमुख मार्गांनी धामणगावशी जोडलेला आहे ङ्क वाठोडा ते दाभाडा मार्गे जुना धामणगाव आणि वाठोडा ते गजानन सहकारी सूतगिरणी मार्गे, मंगरूळ दस्तगीर-धामणगाव रोड. मात्र या दोन्ही रस्त्यांची कामे मागील काही महिन्यांपासून थांबलेली आहेत, आणि प्रशासन व लोकप्रतिनिधींनी याकडे पूर्णत: दुर्लक्ष केले आहे.

विशेषत: वाठोडा ते गजानन सूतगिरणी हा मुख्य रस्ता खोदून ठेकेदार अचानक गायब झाला आहे. त्यामुळे या रस्त्यावरून दुचाकी चालवणे कठीण झाले असून, वाहनचालकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या मार्गावर सतत गाड्यांचे टायर पंक्चर होतात. त्यामुळे प्रवाश्यांचे हाल व वाहनाचे नुकसान ही बाब नित्याचीच झाली आहे. या परिस्थितीचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांना बसत असून, शाळा आणि क्लासेसला जाण्यासाठी त्यांना प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. धामणगाव रेल्वे ही वाठोडा गावासाठी प्रमुख बाजारपेठ आहे. दैनंदिन आवश्यकतेच्या वस्तू खरेदीसाठी ग्रामस्थांना धामणगावला जावे लागते. याशिवाय, हॉस्पिटल,



तहसील, पंचायत समिती आणि न्यायालय यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी जाण्यासाठीही हाच मार्ग वापरला जातो. दिवसातून शेकडो वाहने आणि नागरिक या मार्गावरून ये-जा करतात, मात्र अत्यंत खराब रस्त्यामुळे हा प्रवास धोकादायक ठरत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या दोन्ही रस्त्यांचे तत्काळ नवीनीकरण होणे आवश्यक आहे. ठेकेदारांकडून अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम केले जाते आणि प्रशासनातील काही भ्रष्ट अधिकारी व अभियंते याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करतात. पर्यायाने मोठ्या प्रमाणात कमिशनखोरी होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या प्रकरणी प्रशासन व लोकप्रतिनिधींनी त्वरित लक्ष घालावे आणि उत्तम दर्जाचे रस्ते बांधकाम पूर्ण करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# गिता बेलपत्रे यांना प्रभात नारी सन्मान पुरस्कार

## राज्यमंत्री माधुरी मिसाळ व पद्मश्री राही पोपेरे यांचे हस्ते प्रदान

महासागर प्रतिनिधी

**चुरणी, ( दि.4 ) –** समाजात बदल घडवाणाऱ्या, निस्वार्थी वृत्तीने कार्यरत असणाऱ्या महिलांचा सन्मान प्रभात तर्फे केला जातो. यंदा हा पुरस्कार मेळघाटातील गिता बेलपत्रे यांना देण्यात आला. पुण्यात शिकत असणाऱ्या निशा भिलावेकर, अनिता भार्वे, निकिता भिलावेकर यांचे सोबत बालगंधर्व सभागृहात त्यांनी हा पुरस्कार स्विकारला.




कोरोना महामारीत या मुलींचे शिक्षण थांबले होते. या मुलींमध्ये गिता बेलपत्रे यांनी आत्मविश्वास निर्माण केला. पुणे येथे आर्थिक मदत मिळवून दिली. आज या मुली (त्रहरू) जिएनएम हा नर्सिंग कोर्स पुणे येथे करत आहेत. एकलव्य इंडिया फाउंडेशन या उच्च शिक्षणासाठी काम करणाऱ्या प्रतिष्ठीत संस्थेच्या सहकार्याने त्यांनी मेळघाट शिक्षण यात्रा या उपक्रमाला सुरवात केली. दरवर्षी या उपक्रमाच्या माध्यमातून मेळघाटातील उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील मुलांना कमी वयात होणारे लग्न, विविध व्यसने, त्याचे दुष्परिणाम तसेच उच्च शिक्षनाच्या संधी यावर जनजागृती करत आहेत. मेळघाट मिलेट मिशन, मेळघाट व्हिलेज लाईफ टुरिझम मिशन मेळघाट नॉन पेस्टीसाईड मिशन, मेळघाट अंगार मुक्त जंगल अभियान असे विविध उपक्रम त्यांचे निसर्गा फाउंडेशन या संस्थेच्या माध्यमातून राबवत आहेत. मेळघाटात अनेक बाहेरून आलेल्या लोकांनी संस्था स्थापन केल्या. काही लोक काम करून मेळघाट सोडून गेले. काही इथेच स्थायिक होऊन उत्तम काम करत आहेत. आपण स्वत: या भागातीलच आहोत मग आपण स्वत: असे संस्था संचालित करून काम केले पाहिजे. आपल्या सारख्या मेळघाटातील युवकांची ग्रासरूट लीडरशिप उभी करून नेतृत्व केले पाहिजे. या उद्देशाने आज वाटचाल सुरु आहे. प्रभात नारी सन्मान हा पुरस्कार त्यांनी मेळघाटातून पुण्यात शिकायला आलेल्या सर्व तरुण, तरुणींना समर्पित केला आहे.

# लाखों रुपयाचे दागिने असलेली बॅग केली परत

## दर्यापूर आगारातील चालक-वाहकाचा प्रामाणिकपणा



महासागर प्रतिनिधी

**दर्यापूर, ( दि.4 )–** एकीकडे पैसा, दागदागिन्यांसाठी सख्खे पण वैरी होत असल्याचं चित्र असताना दर्यापूर आगरात माणुसकीचं दर्शन घडवणारी घटना समोर आली. लाखो रुपयांचे दागिने असणारी बॅग एका वाहकाने आपल्या वरिष्ठांच्या सुपुर्त करित आपला प्रामाणिपणा सिध्द केला. अनेकदा प्रवाशांचे सामान बसमध्ये राहून जाते. त्यावेळी कर्तव्यावर असणारे चालक वाहक सदर सामान आपली जवाबदारी म्हणून आगारात जमा करतात. अशा अनेक घटना घडत असतात. ज्यात प्रवाशांचे सामान नजर चुकीने घाई घाईत बसमध्ये राहून जाते त्यांना ते सामान परत मिळावे यासाठी चालक वाहक प्रयत्न करीत असतात. असाच काहीसा प्रकार दर्यापूर बस आगारात नुकताच घडला आहे. दहीहंडा मुक्काम बसवर कर्तव्यावर असलेले वाहक देवकीसन लक्ष्मनराव पाटकर यांना दर्यापूर आगारात फेरी पूर्ण झाल्या नंतर प्रवासी निघून गेल्यावर एक पिशवी सापडली त्यात सोन्याचे दागिने असल्याचे त्यांना तपासणी केल्यावर कळले. याबाबत त्यांनी सह कर्मचारी चालक संजय मधुकरराव राने यांना सांगितली व दोघांनी मिळून तातडीने दर्यापूर बसस्थानक प्रमुख अरविंद पोटदुखे यांना माहिती दिली व सदर पिशवी त्यांच्या ताब्यात दिली. सदर बाब स्थानक प्रमुखांनी आगार व्यवस्थापक दर्यापूर यांना तातडीने माहिती देऊन नियमानुसार पुढील कार्यवाही केली. आगार व्यवस्थापक आशिष यांनी पाटकर व राने यांच्या प्रामाणिकपणा व कर्तव्य निष्ठपणा बाबत कौतुक करून दोघांचा पुष्प देऊन सन्मान व सत्कार केला. आगारातील सर्व कर्मचाऱ्या कडून दोघांचे ही अभिनंदन होत आहे. जग कितीही बदलले तरी प्रत्येक गोष्टीला अपवाद आहे. जगात प्रामाणिकपणा आजही शिल्लक आहे, या घटनेतून पहायला मिळाला.

# तेराशे गावांमध्ये स्वच्छतेचा कामाची पडताळणी

## स्वच्छतेचे सातत्य कायम राखण्यासाठी शासनाचा उपक्रम

महासागर प्रतिनिधी

**अमरावती ( दि.4 ) –** जिल्ह्यातील ओडीएफ प्लस मॉडल गावांतील स्वच्छतेचे सातत्य कायम राखण्यासाठी आता शासनाच्यावतीने राज्य, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायतीस्तरावर ग्राउंड ट्रूथिंग सेलची स्थापना केली जाणार आहे. जिल्ह्यातील अशा सुमारे तेराशे गावांमध्ये समित्या सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापनाचे विविध उपांग, सार्वजनिक शौचालय, परिसर स्वच्छता, प्रकल्पाची देखभाल व दुरुस्ती तसेच प्रकल्प हाताळण्या करिता केली उपाय योजना



ईत्यादी बाबींची पडताळणी करणार आहे.

### या बाबींची पडताळणी

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा योग्य वापर होणे, आवश्यकतेनुसार देखभाल दुरुस्ती होणे देखील तितकेच महत्वाचे आहे. पूर्ण झालेली कामे उत्कृष्ट दर्जाची आणि पुरेसी असणे आवश्यक आहेत. सदर कामांना जिल्हास्तरावरुन मान्यता देताना जियोटॅग करण्यात आलेल्या फोटोंची पाहणी करून नंतरच सदर कामांना मान्यता दिली आहे का ?, ओडीएफ प्लस मॉडेल झालेल्या गावात मॉडेल गावाचा दर्जा राखला आहे की नाही हे तपासण्यासाठी राज्य पाणी व स्वच्छता मिशन स्तरावरून गावांची पडताळणी केली जाणार आहे.

### जिल्हास्तरावर पाठविणार अहवाल

जिल्हा, तालुका व ग्रामपंचायतीस्तरावर देखील ग्राउंड ट्रूथिंग सेलची स्थापना केली जाणार आहे. ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा, शिक्षक, केंद्र प्रमुख, ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा स्वच्छता समिती सदस्य यांचा समावेश असलेली ही ग्रामस्तरिय समिती असून, प्रत्येक तालुक्यातून सदर समिती मार्फत 10 ते 15 गावाची तपासणी होणार आहे. ग्रामपंचायतींना तालुकास्तरावर अहवाल सादर करावयाचा आहे. त्यानंतर तालुकास्तरावरुन यातील काही ग्रामपंचायतींची पडताळणी करून त्याचा अहवाल जिल्हास्तरावर पाठविला जाणार आहे. त्याचप्रमाणे जिल्हास्तरीय समिती तालुक्यातील ग्रामपंचायतीची तपासणी करुन राज्यस्तरावर अहवाल सादर करेल. ही प्रक्रिया दरमहा होणार आहे. राज्यस्तरावरून दरमहा जिल्ह्यातील पडताळणी झालेल्या गावांची तपासणी होणार आहे.

जिल्ह्यातील ओडीएफ प्लस मॉडेल झालेल्या गावांत स्वच्छतेचे सातत्य कायम राखण्याच्या अनुषंगाने विविध स्तरावर सनियंत्रण करण्यासाठी जिल्हा आणि तालुका स्तरावर ग्राउंड ट्रूथिंग सेल ही संकल्पना शासनाच्या वतीने राबविली जात आहे.


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे श्री. अजिंक्य महादेवराव तांबट यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

मिळकतीचे वर्णन: मौजे देगाव, गट क्र. 18 & 19, Private Block no. E, Shop no. ww situated on the Ground Floor, Busyland Complex ता. आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे श्री. अजिंक्य महादेवराव तांबट हे प्रफुल पुंडलिकराव निकाळजे यांच्या कडून विकत घेण्याचा सौदा झालेला आहे. तदनंतर, श्री. अजिंक्य महादेवराव तांबट यांनी PNB HOUSING FINANCE LIMITED. येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदी खत 29/12/2011 रोजीचे दस्त क्र. 7012 हे मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान, पतसंस्था / राष्ट्रीयकृत / सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही हि विनंती.

शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती
मो. नं. 9823698745

